पिंपरी-चिंचवड
रोखठोक
www.rokhthok.co.in Ganesh Humbe- 9766015111

# बहुचर्चित 'मुसंडी' चित्रपट

## मे महिन्यातील ५ तारखेला होणार प्रदर्शित



**यशोदा नाईकवाडे, उपसंपादक**

पुणे,१९ डिसेंबर: सोनाई फिल्म क्रिएशन प्रस्तुत 'मुसंडी' या मराठी चित्रपटाचा पोस्टर अनावरण सोहळा नुकताच संपन्न झाला. गोवर्धन दोलताडे लिखित व निर्मित आणि शिवाजी दोलताडे दिग्दर्शित हा चित्रपट ५ मे २०२३ ला सर्वत्र प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या पोस्टर अनावरण झाल्यानंतर आता प्रेक्षक या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

आजकाल स्पर्धा परीक्षांचा ताण आणि त्यातील आव्हाने हा सध्या अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. अनेकवेळा प्रामाणिक कष्ट करूनही अपयश येते. अशावेळी मनोधैर्य उंचवण्याची आणि अमूल्य मार्गदर्शनाची आवश्यकता असते. हा विषय केंद्रस्थानी ठेवून **MPSC / UPSC** स्पर्धापरीक्षांवर भाष्य करणाऱ्या मुसंडी या मराठी चित्रपटाची निर्मिती केली आहे. राज्यसह देशातील , **IAS/IPS** आणि यशस्वी उद्योजक यांचे मार्गदर्शन घेऊन या चित्रपटाची रचना करण्यात आली आहे.

या चित्रपटामध्ये रोहन पाटील आणि गायत्री जाधव ही जोडी प्रमुख भूमिका साकारणार आहेत. तर या दोघांसोबत सुरेश विश्वकर्मा, शुभांगी लाटकर, तान्हाजी गलगुंडे, शिवाजी दोलताडे, सुरज चव्हाण, अरबाज शेख, प्रणव रावराणे, अक्षय टाक, घनश्याम दरवडे (छोटा पुढारी), सनमीता धापटे, वैष्णवी शिंदे, माणिक काळे, सुजीत मगर, मयूर झिंजे, ऋतुजा वावरे, विकास वरे, राधाकृष्ण कराळे हे देखील चित्रपटामध्ये भूमिका साकारणार आहेत.

मुसंडी या चित्रपटाच्या पोस्टर अनावरच्यावेळी एमपीएससी बोर्ड महाराष्ट्र राज्याचे चेअरमन किशोरराजे निंबाळकर, माजी मंत्री राम शिंदे, शेखर गायकवाड (साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य), अनिल कवडे (सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य), सुरज मांढरे (शिक्षण आयुक्त महाराष्ट्र राज्य), नामदेव चव्हाण(अप्पर पोलीस आयुक्त पुणे), मितेश गट्टे (अप्पर पोलिस अधीक्षक पुणे ), मिलिंद सोबले (डि. डि. आर. पुणे ग्रामीण), विशाल सोळंकी (आय ए एस), धनंजय आखाडे (अप्पर आयुक्त जी. एस. टी पुणे), राहुल जाधव (मुख्य कार्यकारी अधिकारी शिर्डी देवस्थान), मेघराज राजे भोसले (चित्रपट महामंडळ अध्यक्ष), मच्छिंद्र लंके (कन्हैया उद्योग समूह), आनंद माळी, सुनील चव्हाण (कृषी आयुक्त महाराष्ट्र राज्य पुणे), अंकित गोयल (पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण), वैभव नागणे (उद्योगपती) पांडुरंग वाटारकर (माजी कृषी आयुक्त महाराष्ट्र राज्य), इंद्रनील चितळे (युवा उद्योजक चितळे उद्योग समूह पुणे), बाळासाहेब शिंदे साहेब (अध्यक्ष पोलीस पाटील संघटना महाराष्ट्र राज्य) यांच्यायासह अनेक आयएएस (**IAS**), आय पी एस (**IPS**)उद्योजक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# प्रसार भारती
## प्रादेशिक वृत्त विभाग
## आकाशवाणी, औरंगाबाद

पत्र संख्या – आरएनयुऔरं-5(10)/2021/जनरल/144 दिनांक : 16.02.2022

प्रति,
श्री. वैभव येनेगुरकर
गणपती मंदीरजवळ,
राजेंद्र पेठ गल्ली,
भगवती चौक,
गंगाखेड, जि.परभणी.
मो.7410162919

आकाशवाणी औरंगाबाद केंद्राचा प्रादेशिक वृत्तविभाग आणि एम.जी.एम.विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या वतीने आयोजित 'आजादी का अमृत महोत्सव' प्रश्नमंजुषा स्पर्धेत दि.27.01.2022 रोजी विचारण्यात आलेल्या प्रश्नाचे आपण ई मेल वर अचूक उत्तर दिले.

आपले अभिनंदन.

अचूक उत्तर दिल्याबद्दल आपल्याला प्रमाणपत्र आणि पुस्तक सप्रेम भेट पाठवण्यात येत आहे.

धन्यवाद.

रमेश जायभाये
वृत्तविभाग प्रमुख

आकाशवाणी, औरंगाबाद
प्रादेशिक
वृत्त विभाग
REGIONAL
NEWS UNIT
All India Radio, Aurangabad

प्रादेशिक वृत्त विभाग, आकाशवाणी, औरंगाबाद

आणि

एम.जी.एम. विद्यापीठ, औरंगाबाद

# आज़ादी का अमृत महोत्सव

# प्रमाणपत्र

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त प्रादेशिक वृत्त विभाग, आकाशवाणी, औरंगाबाद आणि एम.जी.एम. विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रश्न मंजुषा स्पर्धेत

श्री. वैभव येणेगुरकर ---------------------------------------- यांनी

सर्व प्रथम योग्य उत्तर दिले. करिता प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| डॉ. आशिष गाडेकर<br>कुलसचिव<br>एम.जी.एम. विद्यापीठ, औरंगाबाद | आज़ादी का अमृत महोत्सव | रमेश जायभाये<br>विभाग प्रमुख<br>वृत्त विभाग, आकाशवाणी, औरंगाबाद |